मा.ना.श्री. उध्दव ठाकरे
मुख्यमंत्री

मा.ना.श्री. अजित पवार
उपमुख्यमंत्री

मा.ना.श्री. बाळासाहेब थोरात
मंत्री, महसूल

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

मा.ना.श्री. हसन मुश्रीफ
मंत्री, ग्राम विकास

मा.ना. श्री. अब्दुल सत्तार
राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल

महा आवास अभियान-ग्रामीण

राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत
"महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२" अंमलबजावणी
चला, या अभियानामध्ये सक्रीय सहभागी होवूया आणि अभियान कालावधीत लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करूया !

महा आवास अभियानाची ठळक वैशिष्ट्ये

- ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणा व पंचायतराज संस्था यांचेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- स्वयंसेवी संस्था (लायन्स क्लब, रोटरी क्लब, इ.), सहकारी संस्था (साखर कारखाने, दुधसंघ, इ.), खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था (IITB, COEP, VNIT, इ.), बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. भागधारकांचा सक्रीय सहभाग वाढविणे.
- ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांची गुणवत्ता वाढविणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.
- प्रशिक्षणे, कार्यशाळा, क्षेत्रीय भेटी, लाभार्थी मेळावे याव्दारे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमताबांधणी करणे.
- माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमाव्दारे जन-जागृती करणे.
- अभियानात उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती आणि संस्था यांचा पुरस्कार देवून गौरव करणे.

"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास, २०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास"

अधिक माहितीसाठी संपर्क :- ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व www.mahaawaas.com या संकेत स्थळास भेट द्यावी.